म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय का. वा.
दा. क्र. ३८४९

# साहित्यसम्राट केळकर

IRBK-0103849
IRBK-0103849




ग्रं. सं. ठाणे

आतां भारत स्वतंत्र झाला आहे. आपला महाराष्ट्रही पुनरपि स्वातंत्र्य भोगीत आहे. सतराव्या शतकांत छत्रपति श्रीशिवाजीमहाराजांनीं महाराष्ट्राला जें स्वातंत्र्याचें सिंहासन मिळवून दिलें, तें इंग्रजी सत्तेनें ढासळून टाकलें. आपल्या मायभूमीला तिच्या हक्काचें तें सिंहासन परत मिळवून देण्यासाठीं जे कोणीं झटले व झगडले अशीं नररत्नें अनेक आहेत हें आपलें भाग्य होय.

स्वतंत्र वृत्ति व त्यागबुद्धि हे महाराष्ट्राचे विशेष गुण — त्याच्या सह्याद्रि-विंध्याद्रींइतकेच उत्तुंग व अभेद्य. ह्या गुणांची गरज स्वातंत्र्य-प्राप्तीसाठीं जितकी होती, तितकीच ह्यापुढेंही लागणार आहे. केवळ राजकीय पारतंत्र्य गेलें म्हणजे सर्वांगीण स्वातंत्र्य आलें असें थोडेंच आहे? आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, इत्यादि सर्व क्षेत्रांत आपल्याला स्वतंत्र व्हावयाचें आहे, नवा महाराष्ट्र, नवा भारत उभारावयाचा आहे. त्यासाठीं पुढील पिढ्यांपुढें नवीं ध्येयें, नवीं मूल्यें, नवीं श्रद्धास्थानें ठेवलीं पाहिजेत. अनास्था, आळस व भोगलोलुपता ह्यांच्या चिखलांत तरुण महाराष्ट्रीयानें रुतून बसतां कामा नये. ध्येयनिष्ठा, सेवावृत्ति व त्यागबुद्धि ह्या गुणांचें रक्त नवीन पिढीच्या नसांतून खेळेल, तरच आपला महाराष्ट्र, आपला भारत सर्वांगीण स्वतंत्रता उपभोगूं शकेल.

ह्या गुणांचें बीजारोपण कसें होणार? एक मार्ग म्हणजे त्या गुणांचे पुतळे असलेल्या पुरुषश्रेष्ठांचीं चरित्रें समजावून सांगणें. महाराष्ट्राला आंग्लशाहींतून मुक्त करण्यासाठीं ज्यांनीं ज्यांनीं लोकोत्तर गुण प्रगट केले, अशांचीं बारा चरित्रें, त्या त्या गुणांवर भर देऊन, लिहिण्याचें मीं योजिलें आहे. राजकीय दृष्टीनें मृतवत् झालेल्या महाराष्ट्राला संजीवन देणाऱ्या विभूतींचीं हीं चरित्रें त्याला नैतिक, सामाजिक, आर्थिक, इत्यादि क्षेत्रांतही नवजीवन देण्यास समर्थ ठरतील असा मला विश्वास वाटतो. महाराष्ट्राच्या कुशींतून असे थोर पुरुष "झाले, आहेत, पुढें होणार" हा श्रीसमर्थांचा आशीर्वाद म्हणजे आपला संजीवनीमंत्रच आहे, नाहीं का?

*दा. न. शिखरे*

'महात्मा' कार्यालय, नातूबाग,
पुणें २, ता. १५ मे, १९५१

महाराष्ट्राचे संजीवक

....६....

# साहित्य सम्राट केळकर

लेखक

दा. न. शिखरे, एम्. ए.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

वाचनालय

केशव भिकाजी ढवळे

श्रीसमर्थ - सदन

गिरगांव, मुंबई

IRBK-0103849

*****

मूल्य आठ आणे

## अनुक्रम

विद्येची साधना ... ... ३
स्वराज्यसेवेचे टप्पे ... ... १०
अष्टपैलू संपादक ... ... १७
स्वराज्याची शिपाई ... ... २८
संस्थारूप जीवन ... ... ३५

सर्वाधिकार प्रकाशकाधीन

प्रथमावृत्ति : १९५२

मुद्रक : बा. ग. ढवळे
कर्नाटक मुद्रणालय
चिराबाजार, मुंबई २

प्रकाशक : के. भि. ढवळे
श्री समर्थ-सदन
गिरगांव, मुंबई ४



# विद्येची साधना

एक हजार पानांचा एक असे एक आकाराचे व सुंदर बांधणीचे बारा ग्रंथ तुमच्या टेबलावर मांडून ठेवले तर तुम्हांला काय वाटेल? आणि तें बारा हज़ार पृष्ठांचें सुंदर व विविध वाङ्मय एकाच माणसाच्या लेखणींतून उतरलेलें आहे असें जर तुम्हांला कळलें तर त्या लेखका-बद्दल तुमच्या चित्तांत केवढा विस्मय वाटेल! केवढा आदर वाटेल!

एखाद्या राजवाड्याच्या द्वारीं सोन्याचांदीच्या फुलांनीं शृंगारलेले बारा हत्ती झुलतांना पाहिल्याचा आनंद हें ‘ समग्र केळकर वाङ्मय ’ दिसतांच कोणाही जाणत्याला होईल ह्यांत शंका नाहीं. ज्ञानाच्या भुकेल्या माणसाला तर पंचपक्वान्नांनीं भरलेलीं हीं बारा सोन्याचीं ताटेंच वाटतील. आणि ह्या पक्वान्नांत विविधता किती, सुंदरता किती आणि रुचि तरी किती नाना प्रकारची! कोठें निबंध आहे, तर कोठें चरित्र आहे;

कोठें काव्य आहे, तर कोठें लघुकथा आहे; कोठें कादंबरी आहे, तर कोठें नाटक आहे. इतिहास घ्या, तत्त्वज्ञान घ्या, विनोद घ्या, वाङ्मयाची प्रत्येक शाखा फुललेली आहे. त्यांत तुम्हांला जुन्या संस्कृतीचा विचार केलेला जसा आढळेल, तसा नव्या तिरंगी नवमतवादाचाही परिचय होईल. आयर्लंडचा इतिहास तुम्हांला समजावून घ्यावयाचा आहे ना? मग केळकर वाचा. फ्रेंच राज्यक्रांतीची तोंडओळख व्हावी असें तुम्हांला वाटतें काय? मग केळकर चाळा. भारतीय तत्त्वज्ञानाचें ओझरतें दर्शन तुम्ही चाहतां काय? तर केळकर पाहा.

राज्यशास्त्र, शिक्षणशास्त्र, साहित्यशास्त्र, कोणत्याही शास्त्राचें प्रवेशद्वार म्हणजे केळकरांचें वाङ्मय. बारा हजार पानांचें व पन्नास रुपये किंमतीचें असें एकछाप वाङ्मय निदान मराठींत तरी दुसऱ्या कोणत्याही लेखकाचें उपलब्ध नाहीं. ह्या भाग्याच्या बाबतींत केळकर अद्वितीय आहेत आणि हें वाङ्मय आहे १९३८ सालापर्यंतचेंच. त्यानंतरच्या दहा वर्षांतही त्यांनीं किती तरी लेखन केलेलें आहे.

जसे खाडिलकर तसे केळकर टिळकांचे सहकारी. लोकमान्यांचे हे उजवे–डावे हातच. योगायोग असा कीं ज्या वर्षी खाडिलकरांचा जन्म, त्याच वर्षी केळकरांचा. इतिहासांत असे योगायोग क्वचित सापडतात. टिळक व आगरकर ह्यांचा जन्म एका सालचाच. रामदास व तुकाराम हेही एकाच वर्षी जगांत अवतीर्ण झाले. २४ ऑगस्ट, १८७२ रोजीं नरसिंह चिंतामण केळकर ह्यांचा जन्म मिरज संस्थानांतील मोडनिंब येथें झाला. केळकर घराणें मूळचें कोंकणांतलें. देवगड तालुक्यांतील वानिवडें येथें त्यांच्या घराण्याचें लहानसें घर व शेती अजून आहे.

श्रीमंत बहुत प्रसन्न

केळकरांचे वडील चिंतोपंत वयाच्या बाराव्या वर्षी, पंचाहत्तर कोस पायीं चालून, मिरजेस आले. त्यांना शाळेचा संस्कार मुळींच घडलेला नव्हता. मिरजेच्या राजेसाहेबांकडे शिफारस मिळवून त्यांनीं किल्ल्यांतील पागेंत नोकरी मिळविली. पगार रुपये तीन व वर वाड्यांतील पंक्तीला जेवण ! चिंतोपंतांनीं श्रीमंतांना रोज फुलांचा एक पुडा देण्याचा क्रम ठेवला. त्यामुळें श्रीमंत बहुत प्रसन्न झाले. त्यांनीं त्यांना कारकुनाची कायमची नोकरी दिली. बढतीही दिली. चांगला पांच रुपये पगार त्यांना मिळूं लागला. लवकरच ते कारकुनाचे स्वारी कारकून, स्वारी कारकुनाचे अव्वल कारकून, नंतर फौजदार आणि शेवटीं खाजगी कारभारी, असे चढत चढत गेले. अखेरपर्यंत त्यांना पंधरा रुपये पेन्शन मिळत असे. नरसोपंतांवरही मिरजेच्या श्रीमंतांची बहाल मर्जी अखेरपर्यंत होती. "समग्र-केळकर-वाङ्मयाला" त्यांच्या द्रव्यबळाचा आधार होता.

केळकरांची बुद्धि तरतरीत. ते धुळाक्षरें शिकले. एक लाकडी फळी. तिच्यावर विटकरांची लाल धूळ पसरलेली. तींत खिळ्यानें 'श्री ग णे....' इत्यादि मूळाक्षरें काढावयाचीं, ही तेव्हांची पद्धत. केळकरांच्या वांट्यास आले होते ते पंतोजी रागीट व मारकट असत. शाळेंतील एक कोपरा पंतोजींच्या पिचकाऱ्यांनीं लाल झालेला व दुसरा मुलांच्या विटकरांच्या धुळीनें लाल झालेला. पंतोजींना टेबल कोठलें नि खुर्ची कोठली ? बसकरावर बसल्याबसल्याच ते छडी आपटीत. मुलांच्या पाठीवरही ते छडीचा प्रयोग वारंवार करीत.

सातव्या वर्षापासून केळकर मिरजेच्या सरकारी शाळेंत जाऊं लागले. वर्गांत त्यांचा नंबर बहुतेक पहिला किंवा दुसरा असे. इंग्रजी पहिली


यत्ता त्यांनीं घरींच केली. त्यांना तीन रुपयांची शिष्यवृत्ति हायस्कूलमध्यें सतत मिळत होती. इतिहास-संशोधक वासुदेवशास्त्री खरे हे त्यांचे संस्कृतचे शिक्षक. 'राम-वनवास' ह्या विषयावर संस्कृतांत कविता करण्याकरतां शास्त्रीबोवांनीं एक बक्षीस ठेवलें होतें, तें केळकरांनीं पटकाविलें. त्याबरोबरच शास्त्रीबोवांचें असें प्रशस्तिपत्रकही पटकाविलें कीं "मध्यम प्रतीच्या बी. ए. ला देखील असे चांगले श्लोक करतां येणार नाहींत." १८८८ सालीं केळकर मॅट्रिक उत्तीर्ण झाले. नंतर ते पुण्यास फर्गसन कॉलेजांत गेले. तेथें नामदार गोखले गणिताचे प्राध्यापक म्हणून त्यांना शिकवावयास होते. आपटे-आगरकरही होते. पण पुण्याहून कोल्हापुरास जाण्याचा योग त्यांना पहिल्या सहामाहींतच आला. कारण कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजांतील एक शिष्यवृत्ति त्यांना मिळाली. परंतु राजाराम कॉलेजांत सेकंड बी. ए. चा वर्ग नव्हता, म्हणून त्यांना पुनः पुण्यास यावें लागलें.

ह्या खेपेस केळकर डेक्कन कॉलेजांत दाखल झाले. त्या कॉलेजची पूर्वपरंपरा मोठी. टिळक-आगरकरांची पुण्याई तेथें नांदलेली. त्याचप्रमाणें खेळ, ऐषआराम ह्यांचीही तेथें चंगळ. केळकरांनीं आपल्या बुद्धीला वाचनाचा आणि शरीराला व्याया-माचा खुराक भरपूर चारला. टेनिस, क्रिकेट व बोटिंग ह्यांचा लाभ



ते दररोज घेत. शनिवारचा त्यांचा कार्यक्रम म्हणजे सकाळीं आठ

वाजेपर्यंत क्रिकेट, नंतर नऊ साडेनऊपर्यंत टेनिस, त्यानंतर नदीवर पोहण्यास जाणें आणि संध्याकाळीं फिरून टेनिस व बोटिंग. कॉलेजांत मृच्छकटिक नाटकाचा प्रयोग संस्कृतांत करण्यांत आला. त्यांत न. चिं. केळकर, श्री. कृ. कोल्हटकर, वगैरे विद्यार्थ्यांनीं भाग घेतला होता. केळकरांनीं नटी,



मदनिका व कुंभीलक अशा तीन भूमिका केल्या. १८९१ सालीं ते बी. ए.ची परीक्षा पहिल्या वर्गांत उत्तीर्ण झाले. कॉलेजच्या ह्या जीवनांतही केळकरांची लेखनाची हौस आणि वादांत तडजोड करण्याची कुशलता अनुभवास येई, अशी साक्ष श्री. श्री. कृ. कोल्हटकर ह्यांनीं दिलेली आहे. 'मी दैववान आहें' असें ते वारंवार म्हणत आणि त्याच्या पुष्टीसाठीं अनेक दाखलेही देत.

वकिलीच्या अभ्यासासाठीं केळकर मुंबईला गेले. तेथेंही त्यांनीं नाट्य व वाङ्मय ह्यांच्या अभ्यासाकडे विशेष लक्ष दिलें. पहिल्या एल्एल्. बी.च्या परीक्षेंत ते नापास झाले. तथापि त्यांनीं हाय खाल्ली नाहीं. परीक्षेंतील यश स्पृहणीय तर खरेंच, पण तेंच म्हणजे कांहीं जीविताचें सर्वस्व नव्हे. तें नाहीं म्हणजे जीवित जगण्यासारखें नाहीं, असें मानून आत्महत्या करणें वेडगळपणाचें होय. परीक्षेंत अपयश येण्याला अनेक कारणें असतात. विद्यार्थ्याची अपात्रता हें त्यांपैकीं केवळ एक. मनुष्याला आपलें तेज दाखविण्याला परीक्षेशिवाय दुसरीं

क्षेत्रें काय थोडीं आहेत? किंबहुना उलट टोकाला जाऊन असेंही म्हणतां येईल कीं जीं थोरथोर माणसें पुढील आयुष्यांत समाजाच्या उपयोगीं पडलीं व कीर्तीनें चमकलीं, त्यांत पट्टींच्या विद्यार्थ्यांची संख्या थोडी आहे. चिपळूणकर, टिळक, आगरकर, खाडिलकर, हरिभाऊ आपटे, इत्यादि कितीतरी भल्याभल्यांनीं परीक्षेच्या भोवऱ्यांत गटांगळ्या खाल्ल्या होत्या.

केळकर धीराचे. त्यांनीं पुनः कसून अभ्यास केला आणि १८९३ सालीं एल्एल्. बी.ची परीक्षा पुनः दिली. त्यांत ते यशस्वी झाले आणि तेही पहिल्या वर्गांत. शिवाय त्यांना डेक्कन कॉलेजचें पन्नास रुपयांचें बक्षीसही मिळालें. दुसऱ्या एल्एल्. बी.-मध्यें ते दुसऱ्या वर्गांत १८९४ सालीं उत्तीर्ण झाले. त्याच्या आधीं सातारा येथें तीन महिने त्यांनीं हायस्कुलांत शिक्षकाचें काम केलें. तीन तासांच्या कामाला त्यांना तीस रुपये पगार मिळे. एल्एल्. बी. झाल्यावर त्यांनीं वकिलीची सनद काढली आणि १८९५ च्या एप्रिल-पासून सातारा येथें वकिली सुरू केली. त्यानंतर त्यांना अक्कलकोट व जमखंडी ह्या संस्थानांतील मुन्सफीची जागा मिळत होती, पण त्यांच्या आयुष्याची गाडी निराळ्याच दिशेनें जावयाची होती.

वकिलीचा अभ्यास चालू असल्या वेळेपासून केळकर 'ज्ञानप्रकाश', 'करमणूक', 'महाराष्ट्र-कोकिळ', 'बोध-सुधाकर' इत्यादि नियतकालि-कांत लेख लिहीत होते. 'नवरदेवांची जोडगोळी' हें रूपान्तरित नाटक त्यांनीं १८९४ सालींच लिहिलें होतें. त्यांच्या लेखनाचे गुण जाणणाऱ्या रानडे वकिलांनीं टिळकांना केळकरांचें नांव सुचविलें. टिळकांनाही 'मराठा' पत्र व आपला वकिलीचा वर्ग ह्या कामीं साहाय्यक हवाच होता.

त्यांनीं ता. १५ मार्च, १८९६ रोजीं सातारचे रानडे वकील ह्यांना पत्र लिहिलें कीं "माझ्या दृष्टीनें पाहिलें तर मला असें वाटतें कीं माझें आयुष्य आतां संपत आलें आहे; म्हणून सार्वजनिक आयुष्यांत जो मला कधींही सोडून जाणार नाहीं असा सहकारी मित्र व कार्यकर्ता मला मिळाल्यास हवा आहे." केळकरांनीं मुन्सफीचा मोह बाजूस सारला आणि ते पुण्यास आनंदानें आले. त्यांना टिळक पाऊणशें रुपये पगार वकिलीचा वर्ग चालविण्याबद्दल देत होते. शिवाय 'मराठ्यां'त लिहिण्याचा मुशाहिरा निराळा. जेवणखाण टिळकांच्याच घरीं होत असे. अशा रीतीनें केळकरांना टिळकांचा उन्नतिकारक सहवास लाभला, परिसच भेटला.



# स्वराज्यसंघाचें रणें

"थोर माणसाजवळ स्वर्गांत राहणें हें भूषण आहे. पण त्याच्याबरोबर मृत्युलोकीं राहून काम करणें महाकर्मकठीण आहे." अशा अर्थाचें एक इंग्रजी वचन आहे. त्याचा अनुभव लो. टिळक ह्यांच्या सहवासांत आलेल्या सर्व लोकांना येऊन चुकला. केळकरांनाही तोच अनुभव मिळाला. इकडचेंतिकडचें वाचावें, 'आम्ही' म्हणून मन मानेल तसें लिहावें आणि सभापरिषदांत मिरवावें, सरकारदरबारीं वजन मारून असावें—असे संपादक टिळक स्वतः नव्हते आणि आपल्या सहकाऱ्यांनाही ते तसे होऊं देत नसत. वर्तमानपत्र भरून काढलें कीं सुटलों, ही नोकरवृत्ति टिळकांपुढें चालतच नसे. ते आपल्या सहकाऱ्यांना स्वस्थ बसूंच देत नसत, चैन पडूं देत नसत. "हें करा,

तें करा" अशी हुटहूट सारखी चाले. समुद्राच्या लाटा जशा रात्रंदिवस उसळतात, आदळतात आणि गर्जना करतात, अशीं टिळकांचीं कार्यें अखंड चाललेलीं ! आणि त्यांत ते केळकर-खाडिलकरादि सर्वांना गुंतवून टाकीत — निष्ठुरपणें राबवीत.

केळकर टिळकांना जाऊन मिळाले, त्यानंतर थोड्याच दिवसांनीं महाराष्ट्रावर दोन संकटें कोसळलीं. तीं म्हणजे दुष्काळ व प्लेग. ह्या संकटकाळीं लोकांना मदत करण्यास टिळक धावून गेले. अर्थातच त्यांच्या सहकाऱ्यांना व अनुयायांना त्यांच्याबरोबर काम करावें लागे. 'सार्वजनिक सभे'च्या वतीनें १८९६ च्या दुष्काळांत टिळकांनीं मोठी चळवळ केली. निरनिराळ्या जिल्ह्यांत निरनिराळे कार्यकर्ते त्यांनीं पाठविले. केळकरांच्या वांट्याला त्यांनीं सातारा जिल्हा दिला ; कारण केळकर तेथले माहितगार, तेथें तीन-चार वर्षें राहिलेले, नऊ महिने वकिली केलेले. केळकरांचे वडील बंधु साताऱ्च्या कलेक्टराचे डेप्युटी चिटणीस होते. केळकरांनीं साताऱ्च्या कलेक्टरांची भेट घेतली. परस्पर-विचार-विनिमय झाला. संभाषणाच्या शेवटीं कलेक्टर केळकरांना म्हणाले, "तुमच्यासारखे तरुण पदवीधर लोक खेड्यापाड्यांतून पायपिटी करूं लागले ह्याचें मला आश्चर्य वाटतें. कारण ही गोष्ट पूर्वीं घडलेली नाहीं."

वास्तविक दुष्काळ-निवारणाचें काम परोपकाराचें — वादापलीकडचें — सरकार व पुढारी ह्यांनीं सहकार्य करण्याचें. पण तो काळच असा चमत्कारिक होता कीं कोणा कार्यकर्त्यानें जरा हालचाल केली, रयतेच्या वतीनें सनदशीर अर्ज जरी सरकारकडे पाठविले, तरी सरकारी अधिकाऱ्यांचा घुस्सा व्हावयाचा ! आणि तेव्हां सरकारी दडपशाही इतकी

१५०२
१३।१०।८३


बेगुमान, बेकायदा व बेदाद असे कीं कोणाही फाटक्या अधिकाऱ्यानें रागानें आपली भुवई वाकडी केली, तरी इंद्रानें आपलें धनुष्यच वाकविल्यासारखें भय जनतेला वाटावें. अधिकारी फार दडपत, लोक फार घाबरत. ह्याचा एक विनोदी मासला केळकरांच्या अनुभवास आला. कल्याणजवळ टिटवाला नांवाचें एक गांव आहे. तेथून टिळकांना एक पत्र आलें, "येथें दुष्काळनिवारणाच्या सभेची मोठी तयारी केली आहे. गांवगन्नाचे पुष्कळ लोक येणार आहेत. तरी आपण व्याख्यानासाठीं अवश्य यावें." टिळकांना वेळ मोकळा नव्हता म्हणून त्यांनीं केळकर व परांजपे ह्यांना जाण्यास सांगितलें.

आधीं पत्र पाठवून हे दोघे तरुण देशभक्त टिटवाला स्टेशनावर सकाळीं दहाच्या गाडीला उतरले. त्यांची अपेक्षा अशी कीं आपल्या स्वागताला स्टेशनावर गांवची मंडळीं आली असतील. पण कोणीही आलें नव्हतें. फार काय, त्या दोघांशिवाय तिसरा प्रवासीही तेथें उतरला नाहीं. बैलगाडी करून दोघे टिटवाल्यास गेले. पण गाडी कोणाच्या दाराशीं उभी करावी ? गांव तर उजाड दिसत होता. ते दोघे शाळा-मास्तरच्या घरीं गेले. त्यानें भीतभीत सांगितलें, "गांवांत सभा होणार असें कांहीं माझ्या ऐकिवांत नाहीं. आज माझ्या घरीं श्राद्ध आहे, चार वाजतां जेवण होईल. जेवण करून आपण संध्याकाळच्या गाडीनें परत जावें."

जेवण झालें. केळकर-परांजपे बैलगाडीनें परत निघाले. गांवाबाहेर एक मैलभर गेल्यावर, "अहो थांबा, अहो थांबा." असें म्हणत एक इसम धावत येतांना दिसला. गाडी थांबली. त्या माणसानें रस्त्यावर

दंडवत घातलें. तो दोन्ही हातांनीं आपल्या तोंडांत मारून घेऊं लागला. मग हुंदके आवरून तो म्हणाला, " मींच टिळकांना बोलाविलें. त्यामुळें साऱ्या गांवाचा माझ्यावर बहिष्कार पडला आहे. सभा करीन तर ह्या देहाशिवाय दुसरा श्रोता तुम्हांला मिळणार नाहीं. " अशी दहशत !

दुष्काळाच्या पाठोपाठ प्लेग आला. लोक " त्राहि भगवन् " झाले. सरकारचा अंमल करडा. उद्दाम सोजिर घराघरांची तपासणी करूं लागले. लोकांनीं पेठापेठांना स्वयंसेवक-मंडळें स्थापिलीं. सदाशिव पेठेचे स्वयंसेवक-प्रमुख केळकर होते. तपासणीच्या वेळीं सोजिरांबरोबर घरोघर जाणें, सरकारच्या 'आरोग्य-छावण्यांतील' तक्रारी अधिकाऱ्यांकडे पोचविणें, इत्यादि कामें केळकरांनीं अंग मोडून केलीं. ती त्यांची कामगिरी लक्षांत घेऊन पुण्याच्या कमिशनरनें त्यांना विचारलें, " तुमची ही कामगिरी पाहून तुम्हांला रावबहादुर ही पदवी द्यावी अशी



शिफारस मी सरकारकडे करणार आहें. त्याला तुमची संमति मिळेल का?" केळकरांनीं नकार दिला आणि म्हटलें, "तुम्हांला कांहीं बक्षीस द्यावयाचेंच असेल तर तें नगरपालिकेला द्या. तें बक्षीस असें कीं पूर्वीं नगरपालिकेंत सरकारनियुक्त दहा सभासद होते, ते आतां अठरा केले आहेत; ते पुनः दहाच ठेवा." १८ व्या शतकांत ईस्ट इंडिया कंपनीचें एक शिष्टमंडळ फर्रुखसियर बादशहाकडे गेलें होतें. त्या शिष्टमंडळांतील डॉ. हॅमिल्टन ह्यानें बादशहास औषध देऊन त्याचा रोग घालविला. तेव्हां बादशहानें बक्षीस मागण्यास त्यास सांगितलें; पण त्यानें स्वतःसाठीं कांहीं न मागतां कंपनीस ३८ गांवें व जकातीची माफी मिळविली. अशीच निरपेक्षता केळकरांनीं दाखविली नाहीं काय?

नगरपालिकेसारख्या स्वराज्यसंस्थांवर केळकरांची ही भक्ति पहिल्या-पासून शेवटपर्यंत होती. स्वराज्याचे टप्पे इंग्लंडांतील जनतेनें कसकसे जिंकले होते हा इतिहास त्यांना माहीत होता. न्यायमंदिरांत पंचाचा (ज्यूरीचा) हक्क मिळविण्यासाठीं किती झगडे करावे लागले, ह्याची जाणीव ते इतरांना नेहमीं देत आणि म्हणत, "ज्यूरर होण्याचा कंटाळा करूं नका. तो नागरिकांचा महत्त्वाचा हक्क आहे." तसेंच म्युनिसिपालिट्या, लोकलबोर्डें, कौन्सिलें — वगैरे अधिकाराचीं स्थानें म्हणजे त्यांना स्वराज्याच्या खेळांतील कटीच्या जागा वाटत — जनसेवेचीं साधनें भासत. हे एकएक हक्क मिळविण्यासाठीं किती तरी पुढाऱ्यांना कैक वर्षें झुंझावें लागलेलें आहे. त्या हक्कांतूनच स्वराज्य चालविण्याची पात्रता लोकांमध्यें निर्माण व्हावयाची आहे. म्हणून स्थानिक स्वराज्य-संस्थांना 'खराट्याचें स्वराज्य' असें म्हणून कोणीं हिणविलें कीं केळकरांच्या

' अंगाचा तिळपापड होई. ' त्यांचें ठाम मत असें होतें कीं ' ग्रामपंचायती ह्या स्वराज्याच्या प्राथमिक शाळा, म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्डें हीं स्वराज्याचीं हायस्कुलें आणि कायदेकौन्सिलें हीं स्वराज्याचीं कॉलेजें किंवा युनिव्हर्सिटी. ' हें आपलें मत त्यांनीं कृतींतही आणलें होतें.

१८९८ सालीं ते पुणें नगरपालिकेंत निवडून गेले. तेथें ते १९२२ पर्यंत सतत निवडून जात. सुरत, अहमदाबाद येथें जाऊन ड्रेनेजचें झालेलें व होणारें काम पाहून म्युनिसिपालिटीकडे रिपोर्ट करण्यासाठीं केळकरांची योजना झाली. ते मॅनेजिंग कमिटीचे मेंबर बहुधा नेहमीं असत. मार्केट-कमिटीचे चेअरमन ते सहा वर्षें होते, तेव्हां मार्केट सुधारण्यासंबंधानें त्यांनीं विस्तृत रिपोर्ट केला. १९१२ सालीं त्यांना उपाध्यक्ष नेमण्यांत आलें. १९१८ सालीं त्यांची निवडणूक अध्यक्षाच्या जागीं झाली. ' लोकनियुक्त पहिले अध्यक्ष ' हा मान त्यांना लाभला.

पुणें जिल्हा लोकलबोर्डाचे सभासद ते १९०४ सालीं झाले. सार्वजनिक सभेचे चिटणीस १९०७ सालीं ते झाले. मुंबई विधिमंडळाच्या निवडणुकीस ते १९०९ सालीं उमेदवार म्हणून उभे राहिले, पण सरकारनें त्यांना बंदी केली. मुंबई वगळून थेट दिल्लीलाच त्यांनीं १९२३ सालीं उडी मारली. दिल्लीच्या विधिमंडळाचे सभासद म्हणून ते मध्यभागातर्फे निवडून आले. १९२६ सालीं प्रतिसहकारपक्षातर्फे ते पुनः दिल्लीच्या कायदेमंडळांत निवडून गेले आणि ह्या स्वराज्य-संस्थांच्या आक्रमणांतील शेवटचें पाऊल म्हणजे लंडन येथील गोलमेज परिषदेला ते १९३२ सालीं हजर राहिले.

*****************

लहान असो, मोठी असो, लोकांच्या प्रातिनिधिक संस्थेंत शिरावें, अधिकारावर चढावें आणि आपल्या विद्वत्तेचा, निःस्पृहतेचा व समतोलपणाचा फायदा जनतेस द्यावा, ही सेवाबुद्धि केळकरांच्या अंगीं मोठ्या प्रमाणांत होती. १९०८ सालीं टिळकांनीं दारूबंदीची चळवळ पेटविली, तींतही केळकरांनीं बराच मोठा भाग घेतला. कलेक्टरकडे गेलेल्या शिष्टमंडळांत ते होते. तसेंच दारूबंदी करण्यासाठीं गुत्त्यावर स्वयंसेवक निरोधन करीत असतां त्यांच्यावर जे खटले चालत, त्यांतील कांहीं वकीलपत्रें घेऊन केळकर कोर्टांत कामें चालवीत.

श्री. हरिभाऊ आपटे किंवा श्रीपाद कृष्ण कोल्हटकर ह्यांच्याप्रमाणें केळकर हे नुसते साहित्यिक नव्हते. लो. टिळकांच्या साहाय्यानें व मार्गदर्शनानें त्यांनीं सार्वजनिक व सरकारी संस्थांमार्फत राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक अशा नानाविध अंगांनीं समाजपुरुषाची बहुमोल सेवा केलेली आहे. मात्र साहित्यांतील त्यांची सेवा इतकी मोठी आहे कीं त्यांना, त्यांनीं 'नको नको' म्हटलें असतांही, 'साहित्यसम्राट' ही पदवी लोकांनीं एकमुखानें व प्रेमभरानें अर्पण केली.



# अष्टपैलू संपादक

जगांतील सारे देश सिकंदरानें जिंकले म्हणतात. तसे मराठी साहित्यांतील सारे प्रांत केळकरांनीं पादाक्रान्त केले. समुद्र म्हणजे सर्व सरितांचा पति, तसें केळकरांचें वाङ्मय म्हणजे सर्व विषयांचें क्रीडास्थान. ‘सर्व तीर्थांचा राजा’ असेंही सागराला म्हणतात, तसेंच मराठींतील उत्तमोत्तम भाषाशैलींचें आगर म्हणजे केळकर ! कोणत्याही भाषागुणाचा अतिरेक होऊं न देतां, सर्व शैलींतील सौंदर्याचा संगम केळकरांच्या लेखनांत झालेला आढळतो. लेखनाची हौस त्यांना जबर — व्यसन म्हटलें तरी चालेल. हवेशिवाय प्राणी जगूं शकत नाहीं, तसेंच लेखणी-शिवाय केळकरांचें होत असावें. “त्यांच्या शरीरांतून रक्त वाहत

****************

नसून शाईच वाहत असे" असें विनोदी वर्णन त्यांच्या एका भक्तानें केलें आहे. लिहावें, खूप लिहावें, आणि तें नटवून–सजवून, खुलवून–फुलवून, सुंदर लिहावें ही त्यांना मोठी हौस. प्रेमळ आईला आपल्या लाडक्या मुलीच्या अंगावर किती दागिने घालूं आणि न घालूं असें होतें, तसें केळकरांच्या चपळ लेखणीला आपल्या भाषेवर अलंकार चढवितांना स्फुरण चढे. त्या अलंकारांतही समर्पक उपमा देण्यांत त्यांचा हातखंडा. 'उपमा कालिदासस्य' हें वर्णन संस्कृतांत जितकें अबाधित, तितकेंच 'उपमा नरसिंहस्य' हें विधान मराठी गद्यांत आजतागायत अखंडित आहे.

केळकरांच्या लेखन-संपत्तीचें मुख्य वाहन म्हणजे केसरी. सोन्याच्या पालखींतून एखाद्या लावण्यसंपन्न व अलंकारसंपन्न महाराणीनें नगरांतून मिरवावें, तशी प्रसिद्धि केसरीमुळें केळकरांच्या लेखनाला लाभली. दर आठवड्याला लेख लिहिण्याची केसरीमुळें सक्ति आणि तो लेख विद्वत्ता व विनोद ह्या दोन गुणांनीं नटवून चिरस्थायी करण्याची केळकरांना ऊर्मि. गुण व संधि ह्यांचा नामी मेळ जमला. एकेचाळीस वर्षें केळकरांनीं केसरी-मराठा संस्थेंत काढलीं. त्यांपैकीं १८९७ ते १९०८ आणि १९१० ते १९१८ हीं सुमारें वीस वर्षें त्यांनीं 'मराठा' पत्राचें संपादन केलें. त्या पत्रांत त्यांनीं जे इंग्रजी लेख लिहिले त्यांची वाहवा प्रागतिक पुढाऱ्यांनींही केली. ताईमहाराज प्रकरणांत १९०४ सालीं मुंबई हायकोर्टानें टिळकांना दोषमुक्त केलें. ह्या निकालावर केळकरांनीं 'मराठ्या'चे वीस स्तंभ भरतील एवढा मोठा अग्रलेख दीड दिवसांत लिहून काढला. तो लेख टिळकांना इतका आवडला कीं त्याच्या शेकडों

प्रती काढून इंग्लंडमध्यें वांटण्यांत आल्या. केळकर टिळकांकडे प्रथम आले ते 'मराठ्यां' त लिहिण्यासाठींच ; 'केसरीचें कसें काय जमेल कोणास ठाऊक !' अशी भीति त्यांनीं त्या वेळीं प्रगट केली होती.

पण योगायोग असा कीं 'केसरी' हेंच केळकरांचें खरें क्रीडास्थान बनलें, मुख्य सेवास्थान ठरलें. १८९७ ते १८९९, १९१० ते १९१८ आणि १९२० ते १९३०, अशीं वीस वर्षें केळकरांचें नांव केसरीवर संपादक म्हणून होतें. नांव नसतांही त्यांनीं 'केसरीं' त लेखन खूपच केलें. १९३० नंतर सात वर्षें ते 'केसरी' चे संचालक होते. पण त्यांनींच म्हटल्याप्रमाणें, संचालकीय व संपादकीय कामांत फारसा भेद नव्हताच. फार काय, १९३७ सालीं ते संचालक-पदांतून निवृत्त झाले, तरी केसरींतील लेखनाचा कांहीं संन्यास त्यांनीं घेतला नाहीं.

दररोज नव्या ग्रंथाचीं दीडदोनशें पानें वाचणें हा त्यांचा खुराक अखेरपर्यंत चालू होता ; त्याचप्रमाणें "दिसामाजि कांहीं तरी तें लिहावें" हा दास-बोधही ते अखंड पाळीत होते. पाऊस पडूं लागल्यावर शेताकडे न पाहणें शेतकऱ्याला जमेल का ? रणशिंगें वाजूं लागल्यावर वीराला स्वस्थ बसवेल का ? तसेंच एखादा वर्णन अथवा टीका करण्यासारखा महत्त्वाचा प्रसंग वा विषय पुढें आला असतांना केळकरांना त्यावर लिहिल्याशिवाय राहवतच नसे, मग ते संपादक असोत वा नसोत.

१९०८ सालीं टिळकांवर इतिहास-प्रसिद्ध खटला झाला. खटल्याची सविस्तर हकीकत लघुलेखन-पद्धतीनें एका युरोपियनाकडून लिहून घेतली होती. ती रोजच्या रोज छापून प्रसिद्ध करण्याचा हेतु होता ; पण

छापखानेवाल्यांच्या भीतीमुळें तो फसला. तेव्हां केळकरांनीं त्या माहितीच्या आधारें तीन-चारशें पानांचें एक पुस्तक झटपट तयार केलें. ह्या पुस्तकाचें शेवटचें मुद्रित पाहून केळकर छापखान्याची पायरी उतरतात, तोंच त्यांच्यावर हायकोर्टाची नोटीस बजावण्यांत आली. टिळक-खटल्याच्या निकालावर केळकरांनीं ‘ मराठ्यां ’त जो लेख लिहिला, त्यावरून हा खटला केळकरांवर करण्यांत आला होता. ‘कोर्टाची बेअदबी’ केल्याचा आरोप त्यांच्यावर होता. ह्या गुन्ह्याला शिक्षा एकच. ती म्हणजे माफी मागणें नाहींतर जन्मभर तुरुंगांत राहणें. पण प्रारंभीं केळकरांच्या बाणेदारपणानें उचल खाल्ली. त्यांनीं माफी मागण्याचें नाकारलें. त्यांना बाराशें रुपये दंड, चौदा दिवसांची कैद व माफी मागेपर्यंत फिरून कैद अशी शिक्षा देण्यांत आली. केळकरांनीं दंड भरला. टिळक - आगरकरांनीं पवित्र केलेल्या डोंगरीच्या तुरुंगांत त्यांनीं चौदा दिवस काढले आणि नंतर अगतिकपणें माफी मागितली. डोंगरीच्या तुरुंगाचें वर्णन करणारी कविता केळकरांनीं लिहिली. डोंगरीचा तुरुंगवास असो किंवा सोन्या मारुतीचा सत्याग्रह असो, केळकरांची पहिली प्रतिक्रिया काव्यरूपानें प्रगट होई. ह्यावरून ‘ते हाडाचे खरे साहित्यिक आहेत’ हें त्यांच्या साठी-समारंभाच्या वेळीं ‘केसरी’नें केलेलें वर्णन कोणासही पटेल.

केळकरांच्या संपादकीय कर्तृत्वाची खरी कसोटी १९१० ते १९१४ आणि १९२० ते १९३२ ह्या दोन कालखंडांतच लागली. बाकीच्या काळांत टिळक पर्वतासारखे त्यांच्या पाठीशीं असत. ते पुण्याबाहेर गेले तरीसुद्धा, आपल्या घरट्याकडे लक्ष ठेवणाऱ्या आकाशांतील घारीप्रमाणें, आपल्या पत्राकडे फार बारकाईनें लक्ष पुरवीत. परप्रांतांतूनही सल्ला

देत व सूचना करीत. पण १९१० ते १९१४ ह्या काळांत सरकारनें टिळकांना काळया पाण्याच्या पडद्याआड ठेवलें. त्याचबरोबर देशांत दडपशाहीचा घनघोर अंधकार पसरला. अशा वेळीं केसरी टिकवून धरण्याची मोठी जोखीम केळकरांच्या शिरावर येऊन पडली. केसरीची वीरश्रीची परंपरा चालू ठेवणेंही कठीण आणि ती न चालवितां केसरी मिळमिळीत करून त्याच्या लोकप्रियतेला ओहोटी लावणें हें तर मोठ्या नामुष्कीचें! अशा काळजींत सापडलेल्या केळकरांच्या कुशल लेखणीनें आपल्या पराक्रमासाठीं नवे नवे प्रांत शोधले आणि त्यांमध्यें आपल्या वाचकांना गुंगत ठेवून केसरीची लोकमान्यता टिकवून धरली. आयर्लंडचा इतिहास, संस्कृत विद्येचें पुनरुज्जीवन, इत्यादि त्यांच्या लेखमाला म्हणजे 'ज्ञानाचीं सदावर्तें' च होत. आपल्या आकर्षक भाषाशैलीनें, चकित करणाऱ्या अष्टपैलू विद्वत्तेनें आणि मंदमधुर विनोदानें केळकरांचे ह्या काळांतील लेख म्हणजे वाचकांच्या बुद्धीला चमचमीत मेजवानीच वाटत असे.

'हात लावला कीं सोनें' करण्याची जादू मिडास राजाच्या अंगीं होती म्हणतात. तसेंच विषय कितीही रुक्ष असला तरी तो रम्य व प्रसन्न करून सोडण्याची कला केळकरांच्या लेखणीला साधलेली होती. संस्कृत विद्येसंबंधीं लिहितांना त्यांनीं रँ. परांजपे ह्यांचें जें जुन्यानव्या जमान्यांतलें वर्णन केलें आहे, तें फार मनोवेधक आहे. "लुसलुशीत, सुगंधी 'पियर्स सोप' ऐवजीं नित्य सन्निध शेकलेल्या अग्निकुंडांतील भरड भस्मच ते अंगास चर्चीत बसते." अशा विरोधाभासाची दुहेरी वीण केळकर लांबपर्यंत विणत गेलेले आहेत. १९११

सालीं दिल्ली येथें मोठा दरबार भरला. त्यासंबंधीं लेख लिहितांना केळकरांचें सारें इतिहासाचें ज्ञान, भाषेचें नैपुण्य व टीकेचें कौशल्य प्रगट झालें आहे.

'रस्त्यानें होणारा प्रवास मोजायला जसे मैलाचे दगड, जप मोजायला जसे माळेचे मणी, किंवा काळ मोजायला जसे घड्याळाच्या तबकडीवरील अंक, तसे इतिहास-गणनेला लोकोत्तर राष्ट्रीय प्रसंग उपयोगी असतात', अशीं अलंकारिक वाक्यें, बागेंतील बाकाप्रमाणें, विश्रांतीसाठीं वाचकांना वारंवार भेटतात. "दिल्ली म्हणजे थडगीं, जयस्तंभ, मनोरे, कत्तली!" हें समीकरण वाचकांच्या मनावर ठसविण्यासाठीं तेथें उद्यास्त पावलेल्या साम्राज्यांचा इतिहास केळकरांनीं सांगितला आहे; पण तो कादंबरीसारख्या चटकदार भाषेनें. केसरीचा हा अज्ञातवास १९१४ सालीं संपला. टिळक मंडालेहून परत आले. त्यांना देशांतील सारें चैतन्य थंडगार झालेलें आढळलें; पण समाधान एवढेंच वाटलें कीं केळकरांनीं केसरी जिवंत ठेवला.

ह्याहीपेक्षां कठीण कसोटी टिळकांच्या मृत्यूनंतर केळकरांच्या संपादन-चातुर्याला लागली. १९२० सालानंतर देशांत 'गांधीयुग' उद्यास आलें. त्याच्याशीं केळकर समरस होऊं शकले नाहींत. त्यांच्या हिशेबी बुद्धीला गांधीजींच्या राजकारणांत दोष दिसूं लागले. ते दोष ते केसरींत स्पष्टपणें मांडीत. पण ते अशा भाषासौंदर्यानें व युक्तिवादानें कीं विरोधकांनाही ते वाचनीय वाटावे. सारा समाज गांधीजींच्या 'मुरलीनादानें' वेडा झाला होता, त्यांच्या मागें जात होता, तरी त्यालाही केळकरांचे लेख वाचावेत असें वाटे. ह्या काळांत टिळक दूर अंतरावरही

नव्हते. विरोधी मताचें वातावरण पसरलेलें होतें. अशा वेळीं आगरकरांच्या धैर्यानें, केळकरांनीं आपलीं मतें केसरींतून निर्भीडपणें पण मनोवेधकपणें मांडलीं. "मी वाईट, तूं वाईट, तो वाईट" असे त्यांचे त्या वेळचे कित्येक लेख गाजले.

टीका-लेखन हा केळकरांच्या लेखणीचा हुकमी एक्का! प्रतिपक्षाची बाजू जास्तींत जास्त चांगली मांडून नंतर तिचें खंडन कुशाग्र बुद्धीनें करण्यांत त्यांची लेखणी मोठी तरबेज. 'टीकाकार' हाच केळकरांच्या जीवनांतील स्थायीभाव. वाङ्मय असो वा राजकारण असो, त्यावर उत्तम टीका करणें हेंच त्यांनीं आपलें इतिकर्तव्य मानलें. १९२० सालानंतर स्वतःला पसंत असलेलें दुसरें राजकारण ते उभें करूं शकले नाहींत. पण आपल्या तर्कनिष्ठ बुद्धीच्या प्रकाशांत हिंदी राजकारणाचे दोष त्यांना आढळले, तेवढे त्यांनीं वेचून – उचलून जनतेच्या दृष्टीपुढें नाचविले. बोडस, खाडिलकर, केतकर वगैरे कांहीं व्यक्तींवर टीका करतांना केळकरांच्या लेखणीचा संयम सुटला असला, तरी एकंदरीनें त्यांचे टीकालेख म्हणजे समतोलपणाचे नमुनेच होत.

आपलें घर फोडून दागिने लुटून नेणाऱ्या चोराच्या करामतीचेंही कौतुक करावयाचा चारुदत्ती उदात्तपणा केळकरांच्या अंगीं होता. 'कुळकर्णीलीलामृत' या ब्रह्मद्वेष्ट्या ग्रंथावर टीका करतांनाही केळकरांनीं त्याचा वाङ्मयगुण वर्णिलाच आहे. 'एखादा विंचू नांगीचा आंकडा पाठीवर वळवून तरतरत धावत आहे हा देखावा चित्रकलेच्या दृष्टीनें चांगला दिसेल, पण तो घरांत निघाला असतां, कोणताही मार्मिक चितारी हातांत पादत्राण घेतल्याशिवाय गप्प बसणार नाहीं.' असें म्हणून केळकरांनीं आपल्या टीकेचें रेशमी पादत्राण

त्या ग्रंथावर हाणलें आहे. ह्याचप्रमाणें ‘ आमचे स्वराज्यद्रोही छत्रपति ’ हा लेखही समतोल व सालंकृत आहे. ‘ वाग्वैजयंती ’ची त्यांची प्रस्तावना म्हणजे तर प्रसन्न व प्रमाणबद्ध वाङ्मयीन टीकेचा आदर्शच होय. ‘ जर्मन वाङ्मयसम्राट ’ गटे ह्या कवीवरील टीकात्मक लेखही सुबक व डौलदार आहे. ‘ भविष्यकथन : कलियुगांतील पंधरावी विद्या ’ इत्यादि लेखांचे विषयच मुळीं चुरचुरीत आहेत. त्याला केळकरी टीकेची फोडणी मिळाली, त्यामुळें ते फारच खमंग झाले.

राजकारणांतही त्यांच्या टीकेचें गोड हत्यार असेंच चाले. टिळकांप्रमाणें वाघनखें चढवून ते कधीं लिहावयास बसत नसत. रेशमी हातमोजे घालूनच ते प्रतिपक्षावर प्रहार करीत. त्यामुळें वाचकांच्या मनांत कधीं क्षोभ, चीड, संताप किंवा प्रतिकाराची प्रेरणा उत्पन्न होत नसे. फारच रागावले तर ते कधीं सरकारला “ राष्ट्रीय चळवळीवर गाढवाचा नांगर ” अशा श्लेषाचा मऊ फटकारा मारीत, किंवा सोलापुरांतील लष्करी कायद्याच्या वेळीं “ वीर-वानर वृत्तीचा झगडा ” रंगवीत. गोलमेज परिषदेच्या वेळीं ब्रिटिश सरकार कांहीं देत नाहीं पण तेथील धर्माधिकारी मात्र देवळांतून प्रार्थना करतात, ह्या विसंगतीवर चिडून केळकरांनीं काय लिहिलें? तर “ शांतिरस्तु – कांहीं एक न दिलें तरी! पुष्टिरस्तु – ब्रिटिश साम्राज्याची! तुष्टिरस्तु – ब्रिटिश व्यापाऱ्यांची! अविघ्नमस्तु – हिंदुस्थानच्या नोकरशाहीच्या कारभारांत! आरोग्यमस्तु – ब्रिटिश फौजेचें, धनधान्यमस्तु – ब्रिटिश जनतेचें. ”

सिमल्याचीं व विलायतचीं बातमीपत्रें म्हणजे केळकरांच्या काव्यशक्तीनें महाराष्ट्राला दिलेले अमोल नजराणेच! ‘ हिऱ्या-मोत्यांचीं

ताटेंच्या ताटें भरून तीं लीलेनें वर उधळल्याचा' देखावा केळकर क्षणांत दाखवतात, तर कोणी पिंजारी कापूस पिंजून हिमालयाच्या शिखरावर पसरीत असलेला हिमालयाचा देखावा ते वाचकांपुढें उभा करतात. आल्प्स पर्वतावर पांढरें बर्फ पडलेलें पाहून त्यांना खिचडीवर खोबरें किसून टाकल्याची आठवण झाली. केसरीच्या विषयांचें क्षेत्र केळकरांनीं फारच विस्तृत केलें. सुसंस्कृत असा कोणताही वाङ्मयप्रकार केसरींत देण्यास ते तयार असत. कविता येतच असत; नाट्यछटांना प्रथम प्रसिद्धि केळकरांच्या केसरीनेंच दिली; लघुकथांनाही क्वचित आडोसा लाभला; ओझरती नजर, विविध विषय-तरंग, इत्यादि चटकदार सदरें केळकरांनीं उघडलीं. फार काय? 'नवलपूरचा संस्थानिक' ही आपली कादंबरीसुद्धा त्यांतून क्रमशः दिली. मराठी वृत्तपत्राला सर्वांगीण स्वरूप व प्रतिष्ठा मिळवून देण्यांत संपादक केळकरांचा वांटा मोठा आहे.

वर्तमानपत्रांतील लेखन म्हणजे धावतें, घाईघाईचें, क्षणभंगुर, दसऱ्याच्या सोन्यासारखें. त्या दिवशीं त्याला केवढें महत्त्व! पण दिवस संपला कीं झाला पालापाचोळा. शेकडा ९९ वर्तमानपत्री लेखन अशाच दर्जाचें. पण टिळक, आगरकर, केळकर अशांचें लेखन म्हणजे उरलेला एक टक्का. घाईच्या लेखनांतही, स्थिरपद पावणारे त्यांचे लेख. त्यांतही केळकरांचें विशेष लक्ष भाषासौंदर्याकडे. चिपळूणकरांपासून गडकऱ्यांपर्यंत जे जे साज मराठी भाषेच्या अंगावर चढलेले आहेत, त्या सर्वांचें सुंदर संमेलन म्हणजे केळकरांचें वर्तमानपत्री लेखन आणि वर्तमानपत्री लेखन जर इतक्या महत्त्वाचें आणि टिकाऊ स्वरूपाचें, तर महत्त्वाचे व स्थायी स्वरूपाचे म्हणून त्यांनीं जे ग्रंथ

लिहिले त्यांची योग्यता केवढी असेल? न्या. रानडे किंवा इतिहासाचार्य राजवाडे यांच्यासारखें संशोधनात्मक लेखन त्यांनीं केलेलें नाहीं, पण इंग्रजी व संस्कृत वाङ्मयांतील उत्तमोत्तम विचारांचा व सौंदर्यांचा लाभ मराठी वाचकांना करून देण्याच्या कामीं केळकरी लेखणीनें फार परिश्रम घेतले.


त्यांचें त्रिखंडात्मक टिळकचरित्र म्हणजे तर हिंदी राजकारणाचा सुमारें शंभर वर्षांचा सुंदर इतिहासच आहे. 'भारतीय तत्त्वज्ञान' हा ग्रंथ भारतांतील तत्त्वज्ञानाची सुसंगत माहिती देतो. ज्ञानेश्वरी लोकांना दुर्बोध वाटते ना? केळकरांनीं त्यांच्यासाठीं 'ज्ञानेश्वरी-सर्वस्व' लिहिलें. 'मराठे व इंग्रज' हा ग्रंथ इतिहासाचा असला तरी मनोवेधक आहे. फ्रान्स, आयर्लंड, इटली वगैरे देशांतील राज्यक्रांत्यांची आणि नेत्यांची ओळख केळकरांनीं ग्रंथरूपानें करून दिलेली आहे. 'हास्य – विनोद – मीमांसा' व 'राज्यशास्त्र' हे त्यांचे शास्त्रीय ग्रंथ होत. 'तोतयाचें बंड' हें गद्य व 'कृष्णार्जुनयुद्ध' हें संगीत, हीं त्यांचीं दोन नाटकें मार्मिकतेच्या व प्रमाणबद्धतेच्या दृष्टीनें बिनतोड आहेत. 'माझी आगगाडी कशी चुकली?' ही त्यांची विनोदी लघुकथा पुष्कळांच्या तोंडीं खेळलेली आहे. त्यांनीं रचलेल्या सुमारें दोन हजार ओळींच्या कवितांपैकीं वेषभूषा, पर्जन्य, मोटार, फकीर ह्या कविता रसिकांना रिझविणाऱ्या आहेत. त्यांच्या अशा विविध, विपुल व विदग्ध वाङ्मयसेवेमुळेंच 'साहित्यसम्राट' ही पदवी त्यांना सहजगत्या मिळून गेली.

कोल्हटकरांप्रमाणें त्यांचें स्वतंत्र पीठ किंवा शिष्यपरंपरा नाहीं. खाडिलकरांप्रमाणें त्यांनीं विशिष्ट क्षेत्रांत आपलें 'युग' निर्माण केलेलें नाहीं हें खरें, पण माफक अलंकारांनीं नटलेल्या भाषेनें, दोन्ही बाजूंचा विचार करून, समतोलपणें एखादा विषय समजावून

देण्याचा लेखनप्रवाह मात्र त्यांनींच मराठींत आणला आणि त्यानंतर तो एकसारखा वाहत व वाढत आहे.

केळकरांनीं केलेल्या ऋणाचे आपण कृतज्ञ आहोंत हें महाराष्ट्र-शारदेनें अनेक रीतींनीं दाखविलें आहे. बडोदें येथें १९२१ सालीं भरलेल्या महाराष्ट्र साहित्य परिषदेचें अध्यक्षपद आणि १९२७ सालीं पुण्यास भरलेल्या अधिवेशनाचें स्वागताध्यक्षपद केळकरांना देण्यांत आलें. बडोद्याचें त्यांचें भाषण म्हणजे एक रत्न आहे. अध्यक्षीय भाषणाला त्यांनीं नवीच दिशा लावली. मराठी साहित्याचें समालोचन व मूल्यमापन त्यांनीं मार्मिकपणें केलें आणि 'सविकल्प समाधी' चें आपलें तत्त्व त्यांनीं प्रतिपादिलें. तें शास्त्रीय प्रतिपादनही त्यांनीं मोठ्या मनोरमतेनें केलें. 'वाङ्मय' ह्या संज्ञेस पात्र होण्यासाठीं एखादद्दुसराच शब्द पुरा होत नाहीं हा सिद्धान्त ठसविण्यासाठीं केळकरांनीं किती समर्पक उपमा किती कौशल्यानें दिली आहे पाहा.

"कोहिनूरच्या तोंडांत मारील अशा तेजाची एखादी हिरकणी असूं शकेल. पण 'तुझें वजन किती कॅरेट व कोहिनूरचें किती' असें विचारल्यास हिरकणीच्या गालांवर लाजेची गुलाबी चमकलीच पाहिजे."



# स्वराज्याची शिकाई

खच्ची केलेलें झाड अधिकच फुटावें, तसें मंडालेच्या तुरुंगवासानंतर टिळकांचें कर्तृत्व अधिकच फांकलें. महाराष्ट्रापुरतें होतें तें सर्व राष्ट्रापुरतें झालें. महायुद्धाची संधि पाहून त्यांनीं स्वराज्याची निकड लावली. ' साम्राज्याच्या गरजा येती आमच्या काजा. ' हा मंत्र त्यांनीं देशभर घुमविला. १९१६ सालीं ता. २८ एप्रिल रोजीं बेळगांव येथें होमरूल लीगची ( स्वराज्य संघाची ) स्थापना त्यांनीं केली. तिचें चिटणिसपद केळकरांना देण्यांत आलें. कचेरीची शिस्तबद्ध व्यवस्था राखणें, पत्रकें व पुस्तकें प्रसिद्ध करणें आणि कामाचा झटपट उरक असणें ह्या केळकरांच्या तिन्ही गुणांचा वापर टिळकांनीं होमरूल लीगच्या चळवळींत खूपच

केला. नगर येथें लीगची जिल्हासभा भरली तिचे अध्यक्ष केळकरच होते. होमरूल लीगतर्फे भारतमंत्री मि. मॉंटेग्यू ह्यांना भेटण्यासाठीं जें शिष्टमंडळ पाठविण्यांत आलें होतें त्यांत केळकर होते. शिष्टमंडळ भारतमंत्र्याकडे जाण्यापूर्वी आपल्या स्वराज्याच्या मागणीविषयींचें एखादें साधार व सयुक्तिक पुस्तक तयार असावें असें टिळकांना वाटलें. हें महत्त्वाचें काम अगदीं थोड्या वेळांत कोण करून देणार? केळकरांनींच एकशें पंचवीस पानांचें पुस्तक अवघ्या दीड महिन्यांत लिहून तयार करून दिलें. Case For Indian Home Rule ( स्वराज्याची कैफियत ) ह्या घाईनें लिहिलेल्या इंग्रजी ग्रंथांतही विपुल माहिती, बिनतोड कोटिक्रम आणि प्रमाणबद्ध रचना हे केळकरांचे गुण दिसून येतात.

त्या वेळीं स्वराज्य मागणें ही राजद्रोहाची गोष्ट आहे असा बभ्रा सरकार करीत होतें, त्यामुळें स्वराज्यसंघाचे सभासद होण्यास लोक भीत. त्यांतच टिळकांच्या दोन भाषणांवर खटला भरला गेला. लोक फारच दबले. पण 'स्वराज्य मागणें हा गुन्हा नाहीं' असा निकाल हायकोर्टानें दिला. मग लोकांचा उत्साह काय विचारतां? सरकारी भीतीचा लोखंडी दरवाजा टिळकांनीं वर उचलल्यावर लोकांच्या उत्साहाचें धरणच जणूं कांहीं फुटलें आणि व्याख्यानांचे लोटचे लोट वाहूं लागले व सभासदांचें पीक तरारून येऊं लागलें. केळकरांनीं अनेक गांवीं व्याख्यानें दिलीं, वर्गणी जमविली, शाखा स्थापन केल्या.

त्या वर्षी टिळकांना साठ वर्षे पूर्ण झालीं. तेव्हां त्यांचा वाढदिवस जाहीर रीतीनें साजरा करावा अशी कल्पना केळकरांना सुचली. टिळकांना जनतेचें पाठबळ किती आहे, हें सरकारला कळावें हा

राजकीय संग्रामांतील एक डावही त्यांत होताच. एक लक्ष रुपयांची थैली टिळकांना द्यावयाचें ठरलें. केळकरांच्या प्रयत्नानें, तीन आठवड्यांत, केवळ खाजगी रीतीनें, लाखाची रक्कम हां हां म्हणतां जमली. कर्नाटकापासून नागपूरपर्यंत केळकरांनीं एक दौरा काढून टिळकांच्या चाहत्यांकडून वर्गणी जमविली. त्यापूर्वीं एवढी मोठी थैली महाराष्ट्रांत कधींच जमली नव्हती. समारंभ फार चांगला झाला. त्याचें श्रेय मुख्यत: केळकरांनाच, म्हणून केळकरांच्या मित्रमंडळींनीं त्यांचा खाजगी गौरव केला व त्यांना सोन्याची अंगठी नजर केली.

'स्वराज्य संघा'तर्फे विलायतेंत शिष्टाई करण्यासाठीं टिळक १९१८ च्या मार्चमध्यें मुंबईहून निघाले, त्यांच्याबरोबर केळकर होते. पण सरकारनें पासपोर्ट रद्द केल्यामुळें त्या दोघांना कोलंबोहून परत यावें लागलें. त्या वर्षींच्या जून महिन्यांत मुंबई येथें लॉर्ड विलिंग्डन ह्या गव्हर्नरानें एक युद्धपरिषद भरविली, तींत चर्चा करतांना टिळकांनीं बजाविलें, "लष्करी मदत सरकारला हवी तितकी मिळेल; परंतु स्वराज्य दिल्याशिवाय मात्र नाहीं." असें म्हणतांच टिळकांना गव्हर्नरांनीं थांबविलें. "तुच्छ मानूनि जातों" असें म्हणून टिळक परिषदेंतून बाहेर पडले. नंतर केळकरांची पाळी आली. तेही त्यांच सुरांत बोलूं लागले, त्याच तऱ्हेनें त्यांची मुस्कटदाबी झाली आणि त्याच मार्गानें केळकर निघून गेले. गव्हर्नरच्या ह्या धोरणाचा निषेध संध्याकाळीं शांतारामाच्या चाळींत भरलेल्या सभेंत म. गांधी व बॅ. जिना ह्यांनीं केला.

ह्यानंतर मुंबई येथें राष्ट्रीय सभेचें जादा अधिवेशन भरलें, त्यांत केळकरांनीं भाग घेतला. कॉंग्रेसतर्फे विलायतेस शिष्टमंडळ पाठविण्याचें

ठरलें. त्याचे सभासद म्हणून केळकर १९१९ च्या एप्रिलमध्यें इंग्लंडमध्यें गेले. केळकरांना कॉंग्रेसचे चिटणीस म्हणूनही निवडण्यांत आलें होतें. पण ह्या शिष्टमंडळाचेही ते चिटणीस असल्यामुळें पहिली चिटणिसी त्यांनीं सोडली. चिरोल-खटल्यासाठीं टिळक आगाऊ अकस्मात इंग्लंडला गेले होते. तेथें कॉंग्रेस व होमरूल लीग ह्या दोन्ही शिष्टमंडळांचे धुरीण म्हणून टिळक व चिटणीस म्हणून केळकर हेच काम करीत होते. कॉंग्रेसच्या वतीनें तेथें 'इंडिया' नांवाचें पत्र चालू होतें. त्याचें संपादकत्व केळकरांना देण्यांत आलें. एका आयरिश बाईच्या मदतीनें त्यांनीं तें काम चोखपणें पार पाडलें. त्याचें स्मृतिचिन्ह म्हणून ब्रिटिश कॉंग्रेस कमिटीनें निरोप देतांना त्यांना रुप्याचें पदक अर्पण केलें. ऑक्सफर्ड, केंब्रिज, वगैरे ठिकाणीं केळकर जाऊन आले. नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यांत टिळक-केळकर हिंदुस्थानांत परत आले. पुणें येथें रे मार्केटांत त्या दोघांना मानपत्रें देण्यांत आलीं, त्या वेळीं अपूर्व समारंभ झाला. मंडईच्या भाषेंत केळकर म्हणाले, "मानपत्राचा सौदा फार सस्ता झाला."

अमृतसरच्या कॉंग्रेसनंतर पुणें शहरातर्फे केळकर कायदेमंडळासाठीं उमेदवार म्हणून उभे राहिले. १९२० च्या एप्रिलमध्यें सोलापूर येथें केळकरांच्या अध्यक्षतेखालीं 'मुंबई इलाखा प्रांतिक परिषद' भरली. शहाण्या नेमस्तांनीं व अडाणी ब्राह्मणेतरांनीं तिच्यावर दगडफेक केल्यामुळें ती सुरतेच्या कॉंग्रेसप्रमाणेंच इतिहासप्रसिद्ध ठरली. तें लक्षांत राहण्याचें आणखी एक कारण घडलें. तें म्हणजे केळकरांचें न्यायनिष्ठुरत्व. तर्कापेक्षां जीवन मोठें, शास्त्रापेक्षां रूढी प्रमाण आणि नियमापेक्षां

कार्याची मातब्बरी अधिक, ही दृष्टि कार्यकर्त्या टिळकांची. पण केळकरांची दृष्टि उलटी. त्यांनीं घड्याळाच्या कांट्याकडे पाहून प्रत्येक वक्त्याला बोलावयास वेळ दिला. फार काय? टिळकांचें भाषण ऐन रंगांत आलें असतांनाही त्यांनीं अध्यक्षीय घंटा वाजविली आणि त्यांना बसविलें! रँ. परांजपे व डॉ. बेझंट ह्या प्रतिपक्षीयांना केळकरांनीं आपल्या न्यायाचें झुकतें माप दिलें. त्यांच्या विनंतीप्रमाणें केळकरांनीं ठरावावरील मतांचें प्रमाण जाहीर केलें. ह्यामुळें टिळक थोडेसे नाखूष झाले. त्याच दिवशीं दोन प्रहरीं त्यांनीं खाडिलकरांना तोंडी मजकूर सांगून केसरीकरितां परिषदेवर अग्रलेख लिहून पाठविला. त्यांत ही नाखुषी सूचित आहे. रत्नागिरी व अकोला जिल्हा परिषदेचे अध्यक्षही केळकरच होते.

टिळकांना चिरोल-खटल्यांत तीन लाख रुपये कर्ज झालें. तो खटला व्यक्तीचा नव्हता, राष्ट्राचा होता. म्हणून टिळकांना तीन लाख रुपयांची थैली देण्याचा समारंभ १९२० सालीं मे महिन्यांत करण्यांत आला. ह्या कामीं केळकरांनीं खूप मेहनत घेतली. 'संदेश' कार कोल्हटकरांनीं त्यांच्यावर फंडगुंडीचा आरोप केला. पण त्याला टिळकांनीं त्या समारंभांत व केसरींतही सणसणीत उत्तर देऊन केळकरांचा गौरवच केला.

त्यानंतर दोनच महिन्यांनीं टिळक मुंबईस दिवंगत झाले. केळकरांची कर्तव्यनिष्ठा इतकी तीव्र कीं मुंबईंत टिळकांची स्मशानयात्रा निघण्याच्या आधींच ते पुण्यास धावून आले; कारण दोनच दिवसांनीं केसरी निघणार होता. त्यांत अग्रलेख लिहिणें हें त्यांचें कर्तव्य; तें त्यांनीं शंभर

टक्के पार पाडलें. दहा स्तंभ अग्रलेख व दहा स्तंभ इतर माहिती ह्यांनीं भरलेला केसरी मंगळवारीं सकाळीं वाचकांच्या हातांत अचूक पडला. "केळकर पुण्यास धावत गेले ते टिळकांचें मृत्युपत्र हस्तगत करून घेण्याकरतां" असा आरोप त्यांच्या हितशत्रूंनीं त्यांच्यावर केला.


अशा आरोपांची संततधार केळकरांवर त्यांच्या मृत्यूपर्यंत होत राहिली. शाब्दिक आरोपाला शाब्दिक उत्तरानें उडवितां येतें; पण टिळकांच्या मुलांनीं त्यांना नाना रीतींनीं छळलें. तेव्हां त्यांनीं त्या मुलांवर कोर्टांत फिर्याद ठोकली. कोलंबो येथें टिळकांनीं अखेरचें मृत्युपत्र लिहिलें. त्याच्या आधारावर केळकर केसरीचे संपादक व विद्वांस केसरीचे व्यवस्थापक राहिले. हें मृत्युपत्रच खोटें आहे आणि केसरी संस्थेची मालकी आपल्याकडे आहे, अशी फिर्याद टिळक-मुलांनीं लावली. त्यांतच एका टिळक-पुत्रानें भांबुर्डा स्टेशनवर आगगाडीखालीं आत्महत्या केली. उरलेल्या दुसऱ्या मुलानें गायकवाडवाड्याचें कुलूप तोडण्याचा आडदांडपणा केला आणि उपवासही करून पाहिला. ह्या सर्व विरोधामुळें १९२० पासूनचीं दहा वर्षें केळकरांना निवडुंगाच्या फड्यावरून चालण्यासारखीं कठीण गेलीं. आंतून हा विरोध व बाहेर राजकारणांत गांधीविरोधामुळें अप्रियता, असा दुहेरी मारा असतांनाही केळकर आपल्या मनाला योग्य वाटलेल्या मार्गानें नेटानें चालत राहिले. १९३० सालीं हायकोर्टानें टिळकांची फिर्याद काढून टाकली आणि केळकरांची बाजू खरी ठरविली. केळकरांचा ह्या मोठा नैतिक विजय होय.

नों. १५०२६

****************

केळकरांचा थोरपणा दाखविणारा एक विशेष प्रसंग १९३० सालीं घडून आला. त्या वेळीं टिळकांच्या मृत्यूला दहा वर्षें झालीं होतीं. ह्या दहा वर्षांत केळकरांनीं केसरी संस्था टिकविली, सुव्यवस्थित ठेवली, एवढेंच नव्हे, तर तिची संपन्नताही वाढविली. काटकसरीनें कारभार करून केळकरांनीं तीन लाख रुपये संस्थेंत शिल्लक टाकली, हें त्यांचें कर्तृत्व जितकें प्रशंसनीय, त्यापेक्षांही त्यांनीं त्या तीन लाखांचें दान केलें हें त्यांचें औदार्य अधिक स्तुत्य. कोणाला केलें हें दान ? जनतेला. कां ? तिनें टिळकांना चिरोल-खटल्यानंतर तीन लाखांची थैली अर्पण केली होती. "तुम्हीं मला आज विकत घेतलें आहे" असे उद्गार तेव्हां टिळकांनीं काढले होते. तें ऋण फेडण्याचें 'पितृकार्य' केळकरांनीं श्रद्धेनें केलें. ह्या तीन लाखांचा राष्ट्र-कार्यासाठीं ट्रस्ट करण्यांत आला.

पुढच्या वर्षीं केसरीचा एकावन्नावा वाढदिवस होता, म्हणून १०८ पानांचा ज्युबिली अंक केळकरांनीं काढला. विशेष म्हणजे तो सर्वच्या सर्व अंक बहुशः त्यांनीं एकट्यानेंच लिहिला. त्याच्या ३५ हजार प्रती काढल्या तरी त्या अपुऱ्या पडल्या. केसरीला व्यावहारिक वैभव आणि सुव्यवस्था केळकरांनीं चांगली मिळवून दिली.



# संस्थारूप जीवन

टिळक सूर्य, तर केळकर चंद्र. टिळकांचा प्रकाशच केळकरांना पोषक. तो प्रकाश लुप्त झाल्यावर केळकर निस्तेज झाले. त्यांतही गांधीजींच्या सूर्यप्रकाशा-मुळें तर ते दिवसेंदिवस अधिकाधिक फिके पडत चालले. १९२५ सालीं काँग्रेसच्या अध्यक्षपदासाठीं केळकरांचें नांव अनेक प्रांतांनीं सुचविलें होतें. कानपूर काँग्रेसच्या एका चौकाला 'केळकर चौक' असें नांवही देण्यांत आलें होतें. तेथल्या नगरपालिकेनें ज्या चार पुढाऱ्यांना मानपत्र दिलें होतें, त्यांत केळकर एक होते. काँग्रेस वर्किंग कमिटींत बरींच वर्षें महाराष्ट्रातर्फे त्यांनाच घेतलें जाई. त्यांच्या मताला गांधीजी फार मान देत. काँग्रेसची पहिली घटना तयार करण्याचें

काम त्यांनीं केळकर व विठ्ठलभाई पटेल ह्यांच्याकडेच सोपविलें होतें. पण पुढें पुढें गांधीजी व केळकर ह्यांच्या धोरणांत छत्तिसाचा आंकडा येऊं लागला. त्यामुळें काँग्रेसच्या दृष्टीनें त्यांची किंमत कमी होऊं लागली. तथापि स्वराज्यपक्ष, प्रतिसहकारपक्ष व लोकशाही स्वराज्य पक्ष ह्या वाढत्या काँग्रेस-विरोधाच्या संस्थांत त्यांना मानाचें स्थान होतें. शेवटीं तर लोकशाही स्वराज्यपक्षाचे ते सभासद नसूनही अध्यक्षपदाच्या वरचढ असत. काँग्रेसमध्यें १९३४ नंतर गांधीजींची भूमिका तशीच होती.

लोकप्रियतेचें आणखी एक माप म्हणजे निवडणुकी. मध्यवर्ती विधिमंडळांत १९२३ सालीं ते निवडून आले, तेव्हां त्यांना नऊ हजारांहून अधिक मतें पडलीं आणि इतर पांच उमेदवारांना हजाराच्या आंतबाहेर पडलीं. १९२६ सालच्या निवडणुकींतही केळकरांना सुमारें नऊ हजार मतें पडलीं व ते पहिले निवडून आले. ह्या दोन्ही निवडणुकींसाठीं नऊ हजार रुपये खर्च आला, अर्थात तो केसरी संस्थेनेंच केला. दिल्लीच्या विधिमंडळांत केळकरांनीं सहा वर्षें काम केलें.

केळकरांच्या लोकप्रियतेची लाट १९३२ सालीं जोरानें उचंबळली. त्या वर्षीं त्यांना साठ वर्षें पूर्ण झालीं. त्या निमित्तानें ता. २४ ऑगस्ट रोजीं त्यांचा साठी-समारंभ टोलेजंग स्वरूपांत साजरा झाला. लोकनायक अणे ह्यांच्या अध्यक्षतेखालीं त्यांना "केळकर-स्मारक-ग्रंथ" अर्पण करण्यांत आला. त्या ग्रंथाची पहिली आवृत्ति प्रसिद्धीपूर्वींच संपली; म्हणून समारंभाच्या वेळीं दुसरी आवृत्ति प्रकाशित करण्यांत आली. तीही पंधरा दिवसांत उडाली. ह्या समारंभाच्या निमित्तानें केळकरांनीं महाराष्ट्र

******************

विद्यापीठासाठीं आठ हजार रुपयांची देणगी दिली. पण त्याहीपेक्षां अधिक संस्मरणीय अशी एक वस्तु त्यांनीं महाराष्ट्र—साहित्याला दिली, ती म्हणजे एक मंजुळ उपमा! "आजच्या समारंभाला टाइपरायटरवर वाजणाऱ्या घंटेची उपमा द्यावीशी वाटते. ह्या घंटेचा नाद गोड असतो. घंटा वाजल्यावरही चार दोन अक्षरें लिहितां येतील इतकी जागा असते. त्यामुळें आरंभिलेला शब्द तरी पुरा करूं, सोडून द्यावा लागणार नाहीं, अशी खात्री असते. पण मात्र तो तेवढाच शब्द हो! ह्यामुळें मंजुळ घंटानादाला धोक्याचें — निदान सावधगिरीच्या सूचनेचें — स्वरूप येतें." केळकरांचें सुदैव असें कीं 'चार दोनच' नव्हे तर पंधरा अक्षरें लिहिण्याइतकें आयुष्य त्यांना लाभलें.

हिंदुस्थानला स्वराज्य देण्यासाठीं म्हणून ब्रिटिश सरकारनें तीन गोलमेज परिषदा लंडनमध्यें भरविल्या. त्यांपैकीं दुसऱ्या व तिसऱ्या परिषदांचें आमंत्रण केळकरांना आलें होतें. पण फक्त दुसऱ्या परिषदेला १९३२ सालीं ते हजर राहिले. १९३५ सालीं काँग्रेसनें कौन्सिल-प्रवेश मान्य केला. हा आपल्या तत्त्वाचा मोठा विजय होय असें मानून केळकर १९३७ सालीं कार्यनिवृत्त झाले. सुमारें साठ संस्थांच्या अधिकारपदाचे राजीनामे त्यांनीं दिले. ह्यावरून त्यांच्या कार्याचा व्याप व विविधता दिसून येते. 'पूना सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक', 'कॉसमॉस अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक', 'मर्चंट्स को-ऑपरेटिव्ह बँक", "कॉमनवेल्थ विमा कंपनी" इत्यादि संस्थांशीं त्यांचा निकटचा संबंध होता. हिंदुसभा, कविसंमेलन, कीर्तनपरिषद, इत्यादींचे ते अध्यक्ष होते. विधायक संस्थांचें जाळें देशांत पसरावें आणि राष्ट्रपोषक कार्यें वाढीस लावावींत ही केळकरांना मनापासून आवड.

स्वतंत्र राष्ट्रांत ते आदर्श नागरिकच ठरते; पण दुर्दैवानें त्यांचा जन्म परतंत्र हिंदुस्थानांत गेला. त्यामुळें परतंत्रतेशीं लढा खेळणारे वीरच पुढें पुढें येत गेले. त्याग, कष्ट, सेवा, तुरुंगवास सोसणें, प्राणाहुति देणें ह्या गुणांना सर्वांत अधिक महत्त्व प्राप्त होण्याचाच तो काळ होता. स्वातंत्र्यप्राप्ति हेंच आद्य कर्तव्य. त्या युद्धकाळांत विद्वत्ता, समतोलपणा, औचित्य बुद्धि, ह्या देवतांची पूजा करण्यास सवड कोठली ?

स्वातंत्र्याच्या लढ्यांत केळकर सामान्यतः विरोधी भूमिकेवर उभे असले, तरी त्या लढ्याच्या महापुरांत ते न सापडणें अशक्यच होतें. १९३० सालीं पेण येथें त्यांनीं मिठाचा कायदेभंग केला, पुणें येथेंही जप्त वाङ्मयाचें वाचन त्यांनीं केलें, पण त्यांच्या ह्या कायदेभंगाच्या कट्यारीची धार किती आहे हें सरकार जाणून होतें, त्यामुळें त्यानें केळकरांना हात लावला नाहीं. वार केला तरी हार वाटावा अशाच कुशलतेनें केळकर सरकारला विरोध करीत. १९१२ सालीं भोर संस्थानां-तील भापणबंदीचा कायदा त्यांनीं मोडला, त्याबद्दल त्यांच्यावर खटलाही झाला. पण शिक्षा काय ? तर दोन तासांनीं भोर संस्थान प्रजापरिषदेचे अध्यक्ष म्हणून ते बसले आणि वीसएक वर्षांनंतर तर ते भोर दरबारचे सल्लागार -- किंवा सर्वाधिकारीच बनले ! दक्षिणी संस्थान प्रजापरिषदेचें काम त्यांनीं मोठ्या चिकाटीनें बरींच वर्षें केलें. सात संस्थानी प्रजापरिषदांचे अध्यक्ष होण्याचा मान त्यांना मिळाला होता. १९२३ सालीं दिल्ली येथें भरलेल्या अखिल भारतीय संस्थानी परिषदेचेही ते अध्यक्ष होते. १९२१ सालीं दारूच्या गुत्त्यावर त्यांनीं निरोधन केलें आणि १९३७ सालीं सोन्या-मारुतीची घंटा वाजवून कायदेभंग

केला. तरी त्यामुळें सरकारची झोपमोड झाली नाहीं आणि त्यांनीं केळकरांना तुरुंगाची हवा कांहीं दाखविली नाहीं. 'बये घंटिके' ( Tinkle, tinkle, little bell ) ही त्यांची कविता मात्र लोकांनीं व सरकारनें सारख्याच आनंदानें सेवन केली.

लेखनाप्रमाणेंच वक्तृत्वाची केळकरांची शैली आकर्षक होती. खेळकरपणा दोन्हीकडे सारखाच दिसे. पण त्यांनींच लिहिल्याप्रमाणें, सार्वजनिक आयुष्यांतल्या पहिल्या पंचवीस वर्षांपर्यंत मराठी बोलणेंही त्यांना चांगलें साधत नसे. पण समर्पक विषयप्रतिपादन, श्रोत्यांना पटण्यासारखा युक्तिवाद, उपमा-दृष्टान्तांचा भरपूर उपयोग, मधून मधून वाङ्मयाची फोडणी, बहुश्रुतपणाचा ठसा, रचनेचें नावीन्य आणि विनोदाचे तुषार ह्यांमुळें त्यांचें घोगऱ्या आवाजांतील 'खोकलेवाईक' भाषणही सभेवर छाप पाडीत असे. विधिमंडळांतील त्यांचीं भाषणेंही उत्सुकतेनें ऐकलीं जात. विशेषतः विचारपद्धतींत समतोलपणा ठेवून तडजोड करण्याची त्यांची वृत्ति लॉर्ड मोर्ले ह्यांची आठवण करून देत असे.

कोणत्याही वादांत 'सुवर्णमध्य' शोधून काढण्यांत त्यांची बुद्धि तरबेज असे. अस्पृश्यांच्या मंदिरप्रवेशाच्या बाबतींत देवापुढें एक अडसर घालावा आणि तेथूनच स्पृश्य व अस्पृश्य ह्या दोघांनींही दर्शन घ्यावें अशी सुवर्णमध्याची योजना त्यांनीं सुचविली होती. अशा 'मध्यम-क्रमामुळें' कांहीं वेळां दोन्ही पक्ष त्यांच्यावर खूष होत, तर बऱ्याच वेळां दोन्ही पक्ष त्यांच्यावर नाराज होत; पण स्वतःच्या मनाचें समाधान हेंच केळकरांचें

******************

मोठें धन होतें. म्हणूनच १९३९ सालीं लिहिलेल्या 'गतगोष्टीं'त ते म्हणतात, "शेवटीं इतकेंच सांगावयाचें उरलें कीं आज मी अत्यंत समाधानाच्या मनस्थितींत आहें. मन शांत आहे, हात जोडले आहेत 'हाके' ची वाट पाहत आहें!"

ही हाक त्यांना ता. १४ ऑक्टोबर, १९४७ रोजीं ऐकूं आली. त्या दिवशीं रात्रीं ते जे निजले, ते कायमचेच! त्या वर्षींच राष्ट्राला स्वातंत्र्य लाभल्याचें पाहून त्यांनीं आनंद मानला. अत्यंत शांतपणें त्यांची जीवितयात्रा संपली. ती संपेपर्यंत त्यांची बुद्धि, शुद्धि, शक्ति, सर्व कांहीं शाबूत होतें. इतकें कीं मृत्यूच्या आदल्याच दिवशीं त्यांनीं दोन सूचक, सालंकृत व कोटिक्रमपूर्ण अशा कविता प्रसन्न मनानें लिहून ठेवल्या. ह्या कविता पुढीलप्रमाणें —

दिसों लागे मृत्यू परि न भिववूं तो मज शके
तयाच्या भेटीचें असत मजला ज्ञानचि निकें
प्रवेशे रात्रीं जो घरुनिच शतघ्नी निजकरी
न भी तो वाघाला परि हसुनि सुस्वागत करी ॥ १ ॥

मला जन्मा येतां तनुभरण-कार्या कण कण
दिलें पांचां भूतीं परत करणें तें निज ऋण
तदाधारें सौख्यें सतत जगलों तें मज पुरे
तनुत्यागापेसा इतर अनृणा मार्गचि नुरे ॥ २ ॥

IRBK-0103249

IRBK-0103849